# मिरा भाईंदर महानगरपालिका

आयुक्त कार्यालय

मुख्यालय, 2रा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)

दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी commissioner@mbmc.gov.in


MiraBhayandar @2047

जा.क्र. मनपा/आयुक्त / 40 /2024-25 दि.23/01/2025

## कार्यालयीन आदेश

**विषय:-** "अतिरिक्त आयुक्त" पदाच्या अतिरिक्त पदभाराबाबत.

**संदर्भ:-** मा. ना. श्री. प्रतापजी सरनाईक, मंत्री, परिवहन, महाराष्ट्र राज्य यांचे जा.क्र.मंत्री/परिवहन/व्ही.आय.पी./46/2025, दि.21/01/2025 रोजीचे पत्र (प्राप्त दि.23/01/2025).

ज्याअर्थी, मा. ना. श्री. प्रतापजी सरनाईक, मंत्री, परिवहन, महाराष्ट्र राज्य यांनी श्री. अनिकेत मानोरकर, अतिरिक्त आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांची प्रतिनियुक्तीने त्यांचे खाजगी सचिव म्हणून नियुक्ती केलेबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

ज्याअर्थी, मा. मंत्री महोदयांनी श्री. मानोरकर यांची त्यांचे खाजगी सचिव म्हणून दि.22/01/2025 (म.पु.) पासून नियुक्ती केल्याने श्री. मानोरकर यांचेकडे असलेल्या विभागांचा पदभार इतर अधिकाऱ्याकडे सोपविणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, श्री. मानोरकर यांच्याकडे सध्यस्थितीत असलेल्या विभागांचा पदभार या आदेशाद्वारे श्री.सचिन बांगर, उपायुक्त यांचेकडे अतिरिक्त स्वरुपात सोपविण्यात येत आहे. श्री. बांगर यांनी त्यांचेकडील मुळ विभागाचे कामकाज सांभाळून अतिरिक्त आयुक्त पदाचा प्रभारी पदभार तात्काळ स्विकारावा व रुजू अहवाल सादर करावा.

**(संजय श्रीपतराव काटकर,** भा.प्र.से.)
आयुक्त तथा प्रशासक
मिरा भाईंदर महानगरपालिका

**प्रति,**
**श्री. सचिन बांगर,**
उपायुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका.

प्रत:-

1) खातेप्रमुख / विभागप्रमुख (सर्व)
2) संगणक विभाग (संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)
3) स्थळप्रत.

जा.क्र.मंत्री/परिवहन/खी.आर.पी./४६ /२०२५ दि. २२/०१/२०२५

मंत्री
महाराष्ट्र राज्य

मंत्री
परिवहन
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
*www.maharashtra.gov.in*
दिनांक :

उपायुक्त (मु.)
कृ. उचित कार्यवाही करावी.

**दिनांक : २१/०१/२०२५**

श्री. अनिकेत अरूण मानोरकर, उपायुक्त गट-अ / मुख्याधिकारी वर्ग-१ निवडश्रेणी, महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवा, हे सध्या अतिरिक्त आयुक्त, मिरा-भाईदर महानगरपालिका या ठिकाणी कार्यरत असून त्यांची माझ्या मंत्री आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने दि. २२/०१/२०२५ (म.पु.) पासून खाजगी सचिव या पदावर नियुक्ती करण्यात येत आहे.

तरी, श्री. अनिकेत अरूण मानोरकर यांचे प्रतिनियुक्तीचे आदेश त्वरीत निर्गमित करण्यात यावेत.

**(प्रताप सरनाईक)**

**प्रति,**
**उपसचिव (कार्या-२१),**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**मंत्रालय, मुंबई.**

२२/०१/२५

**प्रत १) प्रधान सचिव (नवि-२),**
**नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.**
**२) आयुक्त - मिरा-भाईदर महानगरपालिका.**

२२/०१/२५